# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery Of Stolen Property**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **13/03/2022**

**Brief of the work done :-**

वाशिम शहरात जबरी चोरी करणारी टोळी जेरबंद त्यांचे कडून 5 मोबाईल व दोन मोटार सायकल असा एकूण 1.5 लाखाचा मुद्देमाल हस्तगत

पुण्य नगरी

## मोबाइल चोरणारी टोळी जेरबंद

### अप्पर पोलीस अधीक्षक भामरे यांची पत्रकार परिषदेत माहिती



**वाशीम :** रस्त्याने मोबाइलवर बोलत असताना मागून दुचाकीवरून येवून मोबाइल हिसकावून घेऊन जाणाऱ्या चोरट्यांच्या टोळीला जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे. अप्पर पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांनी १२ मार्च रोजी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली.

या संदर्भात अधिक माहिती देतांना अप्पर पोलीस अधीक्षक भामरे म्हणाले की, वाशीम शहरात अक्षरा तोडकर, विठ्ठल थोरात तसेच कृष्णा पारेकर हे मोबाईलवर बोलत असताना मागून दुचाकीवर येणाऱ्या चोरट्यांनी मोबाईल हिसकावून पळ काढला. याबाबत वाशीम शहर पोलिसं त तीन तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चनसिंह यांनी सदर गुन्ह्याचा तातडीने तपास करण्याचे आदेश दिले होते. यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नेमण्यात आले होते. अप्पर पोलीस अधीक्षक गोरख भामरे व स्थानिक गुन्हे शाखेने अकोला नाका येथे चेकींग पॉईंट लावला असता आकाश रोकडे याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता त्याचे दोन साथीदार सोबत असल्याची माहीती दिली. त्यावरून पोलिसांनी दिपक खिल्लारे व संघपाल कांबळे यांना ताब्यात घेतले. या आरोपीजवळून पोलिसांनी पाच मोबाईल व दोन दुचाक्या असा दीड लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. तसेच यश अनिल सरकटे याच्या डोळ्यात मिरची पुड टाकून लुटल्या प्रकरणी पोलिसांनी तीन विधिसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले होते. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चनसिंह, अप्पर पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक सोमनाथ जाधव यांच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल मोहनकर, विजय जाधव, सुनील पवार, संतोष कंकाळ, किशोर चिंचोलकर, दिपक सोनोने, गजानन अवगळे, अमोल इंगोले, प्रशांत राजगुरू, राजेश राठोड, राजेश गिरी, गजानन गोटे, संतोष शेणकुडे, शुभम चौधरी, किशोर खंडारे, निलेश इंगळे, पुजा पडवाल, मिलिंद गायकवाड, प्रशांत चौधरी, गोपाल चौधरी यांच्या पथकाने केली आहे.

Smart Washim
Page No.4 March 13, 2022